## जिल्हा परिषद, नाशिक

## ई-निविदा सुचना क्र.- २/२०१७-१८ (व्दितीय प्रसारण)

महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद नासिक अंतर्गत जिल्हयातील ग्रामीण व आदिवासी भागातील मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारीरीक विकासासाठी प्रशिक्षण देणे कामी स्थानिक पातळीवरील स्वयंसेवी संस्थांची निवड करणेसाठी ई-निविदांव्दारे दोन पाकीटे पध्दतीने निविदा मागविणेत येत आहेत.

| अ.नं. | कामाचे वर्णन | अंदाजीत रक्कम | बयाना रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारीरीक विकासासाठी प्रशिक्षण देणे | १) जि.प.सेस - रु. २०,००,०००/-<br>२) आ.उ.या. - रु. २०,००,०००/-<br>**एकुण र.रु. - ४०,००,०००/-** | **रु.१,२०,००० /-** |

१) सर्व निविदा प्रक्रीया फक्त ऑनलाईन राहील.

२) डाउनलोड करणेयोग्य निविदेचा कोरा फार्म ,व नियम अटी इत्यादी संबधाने सर्व माहीती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

३) निविदेची किंमत रु.३६००/- गेटवे पेमेंट सिस्टिम पध्दतीने भरणा करण्यात यावी. भरणा केलेची युटीआर प्रत पाकीट क्र.१ मध्ये इतर कागदपत्रासोबत सादर करावा लागेल.

४) संकेतस्थळावरुन निविदा डाउनलोड करणे व अपलोड करणेचा कालावधी दिनांक ---------------- पासून --------------- रोजी १७.४५ वाजेपर्यंत राहील.

५) निविदाधारकाने देकारा सोबत अपलोड केलेल्या खालील प्रमाणे ऑन लाईन युटीआरच्या मुळप्रती दि. -------------- रोजी ११.०० वाजेपर्यंत महिला व बाल विकास अधिकारी जिल्हा परिषद, नासिक , फोन क्र.०२५३- २५०२८१५ यांचे कार्यालयात सादर कराव्या लागतील.

अ) निविदेच्या किमतीचा रु. ३६००/- गेटवे पेमेंट सिस्टिम पध्दतीने भरणा करण्यात यावी.

ब) बयाना रक्कम प्रत्येक साहित्याची स्वतंत्रपणे गेटवे पेमेंट सिस्टिम पध्दतीने भरणा करण्यात यावी.

७) www.mahatenders.gov.in या संकेतस्थावर अपलोड केलेल्या निविदेचा तांत्रीक माहीतीचा भाग दि.-------------- रोजी १५.०० वाजता म. मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प. नाशिक यांचे कार्यालयात ऑनलाईन पध्दतीने उघडणेत येईल.

८) निविदेचा देकाराचा भाग उघडणेची तारीख व वेळ निविदाधारकास ई-मेल / दुरध्वनी / लघु संदेशाव्दारे कळविणेत येईल.

९) कोणत्याही स्वतंत्र अटींची निविदा स्विकारली जाणार नाही. कोणतेही कारण न दाखवता एक किंवा सर्व निविदा नाकारणे अथवा स्विकारणेचा अधिकार राखुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राखुन ठेवला आहे

१०) ई-निविदा संबधाने अधिक माहीती उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नासिक, फोन क्र. ०२५३-२५०२८१५ यांचे कार्यालयात उपलब्ध राहील.

**महिला व बाल विकास अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**

# जिल्हा परिषद, नाशिक.

## ई- निविदा सुचना क्र.   २  /२०१७-२०१८ (द्वितीय प्रसारण)

| | | |
|---|---|---|
| १. | कामाचे नाव | : मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारीरीक विकासासाठी प्रशिक्षण देणे  अंतर्गत स्थानिक पातळीवरील स्वयंसेवी संस्थांची निवड करणे<br>(प्रति लाभार्थी र.रु. ६००/- मर्यादा) |
| २. | निविदा अर्जाची किंमत | : रु.३६००/- ( रु.तिन हजार सहाशे मात्र )  **(परत न मिळणारे)** |
| ३. | संकेत स्थळावरुन निविदा फॉर्म डाउनलोड करणे व बीड अपलोड करणे | : दिनांक ------------- ते ------------ सायंकाळी १७.४५ पर्यंत |
| ४. | बयाणा रक्कम | : रु.१,२०,०००/- ( रुपये एक लक्ष विस हजार मात्र)<br>गेटवे पेमेंट सिस्टिम पध्दतीने भरण्यात यावी व भरणा केलेबाबतची युटीआर  प्रत सादर करावी |

**“निविदा फक्त ई-निविदा पध्दतीने ऑनलाईन स्विकारली जाईल.”**

**महिला व बाल विकास अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,नाशिक**

# महिला व मुलींना व्यावसायीक व तांत्रिक प्रशिक्षण देणे कामी संस्था निवडीच्या नियम व अटी

सर्व निविदा प्रक्रीया फक्त ऑनलाईन राहील. निविदा अपलोड/डाउनलोड करणे अथवा या निविदेसंबधाने सर्व सुचना व त्या बाबतची कार्यवाही यापुढे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरच राहील.निविदा स्विकृतीसाठी खालील प्रमाणे कागदपत्र PDF or Scan Copy Format मध्येच वरील संकेतस्थळावर अपलोड करणेत यावी.

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक हे या निविदा सोबत जोडलेलेल्या प्रपत्र एक मध्ये दर्शविलेल्या तपशिलवार वर्णनाच्या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण देणाऱ्या शासनमान्य संस्थां तसेच प्रशिक्षण केंद्राकडुन निविदा मागवित आहे.
२. निविदा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांचे कार्यालयात दि. ------------------ रोजी सकाळी १५.०० वाजता उघडण्यात येणार आहेत.
३. निविदा धारक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी निविदा उघडण्याचे वेळी हजर राहू शकतील.
४. कोणत्याही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा, निविदा प्रक्रीया रद्द करण्याचा हक्क मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी राखुन ठेवला आहे.
५. एकदा निविदा सादर केल्यानंतर निविदाधारकास अर्ज देऊन निविदा माघारी घेता येणार नाही. अशा प्रकारची घटना घडल्यास निविदा धारक यांची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल.
६. प्रशिक्षणाची रक्कम आणि लाभार्थी संख्या जाहीरातीत दर्शविलेल्या तुलनेत लाभार्थी उपलब्धतेनुसार कमी जास्त होऊ शकतील.
७. निविदेतील अटी व शर्तींची पूर्तता न करणाऱ्या निविदा कोणतेही कारण न दाखविता रद्द करण्यात येतील.
८. निविदेसोबत खालील कागदपत्रे असणे बंधनकारक राहील.

## १ अ) पाकीट क्रमांक १ : तांत्रिक कागदपत्र

१. निविदा फॉर्म फी व बयाणा रक्कम गेटवे पेमेंट सिस्टिम पध्दतीने भरणा केले बाबतची युटीआर प्रत स्कॅन करुन निविदेसोबत जोडावी.
२. निविदाधारकांची संस्था नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. त्याचे उद्दिष्टांमध्ये प्रशिक्षण देणेबाबत तसेच प्रशिक्षणांचा तपशिल असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.
३. निविदाधारकाने निविदेच्या अंतिम तारखेपर्यंत ग्राहय असलेले आयकर भरणा केले संबंधीचे मागील ३ वर्षाचे आयकर निपटारा प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
४. GST नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक आहे.

५. संस्थेस क्रीडा संचालनालय, जिल्हा क्रीडा अधिकारी यांपैकी एक मान्यता प्राप्त असलेचे प्रमाणपत्र तसेच राज्य स्तरावरील ज्युडो-कराटे प्रशिक्षण संस्था म्हणुन मान्यता प्राप्त असलेबाबतचे ज्युडो-कराटे संघटना यांचे प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहील.

६. ई-निविदेतील तांत्रिक अर्हतेसंबंधीच्या दस्तऐवजांचा तपशिल खाली देण्यात आला आहे. या दस्तऐवजांच्या ई-निविदेतील लिफाफा क्रं.१ (तांत्रिक लिफाफा) मध्ये समाविष्ट करण्यात याव्यात. तात्रिक निविदेचा लिफाफा उघडलेनंतर त्यातील दस्तऐवजांच्या आधारे पुरवठाधारकाची पात्रता ठरविण्यात येईल. इतर कोणतेही दस्तऐवज वेळेवर स्विकारले जाणार नाहीत. (Offline स्विकारले जाणार नाहीत)

७. निविदाधारकाने निविदा अर्ज व निविदा अर्जासोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रांवर प्रत्येक पानावर त्यांची सही व शिक्का असणे आवश्यक आहे.

८. मागील तीन वर्षाचे सनदी लेखापालाने प्रमाणीत केलेले नफा-तोटा पत्रक व ताळेबंद जोडावा.

**९. संस्थेचा केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळ्या यादीत समावेश केलेला नसल्याचे स्वयंघोषणा पत्र आवश्यक आहे.**

**१०.सदरचा लाभ हा जिल्हयातील ६६६७ लाभार्थ्यांना देण्यात येईल. निविदा उघडणेचे दिनांकास या संख्येमध्ये वाढ किंवा घट होऊ शकते.**

**११. निविदा ही संपूर्ण जिल्हयासाठी असल्याने विशिष्ट तालुक्यांसाठी/प्रकल्पांसाठीची निविदा ग्राहय धरण्यात येणार नाही.**

१२.संस्थेची वार्षिक उलाढाल ही किमान १०.०० लक्ष असावी. याबाबत मागील ३ वर्षातील सरासरी रु.१०.०० लक्ष वार्षिक उलाढाल असल्याबाबत चार्टड अकाऊन्टंट यांनी दिलेले ताळेबंद जोडावे.

१३.लगतचे ३ आर्थीक वर्षाचे कालावधीतील संस्थेचे ऑडीट रिपोर्ट

१४. संस्थेकडेस संस्थेच्या नावे जाहिरातीच्या दिनांकास र.रु. १.०० लक्ष अथवा त्यापेक्षा जास्त रक्कम बँक खात्यावर शिल्लक असलेबाबत बँकेचे पासबुक अथवा बँकेचे प्रमाणपत्र.

१५.संस्थेकडेस प्रत्येक प्रशिक्षणासाठी पुरेसे कर्मचारी, जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी मान्यता दिलेले ब्लॅक बेल्ट प्रशिक्षक उपलब्ध असलेबाबत प्रमाणपत्रासह माहिती

१६.यापूर्वी जिल्हा परिषदेमध्ये अथवा अन्य शासकीय कार्यालयाद्धारे तिन वर्ष प्रशिक्षणाचे कामकाज केले बाबत अथवा योजना राबविलेबाबतचे संबंधित विभागप्रमुखांचे प्रमाणपत्र

१७. संस्थेचे पॅन कार्डची सत्यप्रत जोडावी

१८.सशर्त निविदा स्विकारली जाणार नाही.

१९.निविदामध्ये कागदपत्रांची अपूर्तता किंवा सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये अपूर्ण मजकुर असल्यास निविदा अपात्र करण्यात येईल.

२०. ज्या ई-निविदामध्ये निश्चित दर दिले नसतील अथवा दिलेल्या दरात संदिग्धता असेल अशी ई-निविदा नाकारण्यास पात्र ठरेल. जर अक्षरी व अंकी दरामध्ये तफावत असल्यास दोन्ही पैकी जो दर कमी असेल तो विचारात घेतला जाईल. एका प्रशिक्षणाचे

दोन प्रकारचे दर दर्शविण्यात येवु नये याबाबत विचार केला जाणार नाही व एका दराप्रमाणे निविदेमधील प्रशिक्षणाचे वर्णनाप्रमाणे कार्यारंभ आदेश दिले जातील.

२१. निविदाधारकाने सादर केलेले ई-निविदा दर हे निविदा उघडल्याच्या दिनांकापासुन ९० दिवसापर्यंत स्विकृतीस पात्र राहतील.

२२. देयकातुन नियमानुसार TDS/GST व इतर शासकीय कर कपात केले जातील.

२३. प्रशिक्षण पूर्ण केलेनंतर बाल विकास प्रकल्पाधिकारी यांचे प्रशिक्षण पूर्ण केले बाबतचे प्रमाणपत्र, लाभार्थी हजेरीपट, रंगीत छायाचित्र, मुख्याध्यापकांचे दाखले असलेशिवाय देयक अदा केले जाणार नाही.

२४. निविदेमधील विवरण पत्रात दर नमुद करणे आवश्यक राहील.

२५. ई-टेंडरींगद्धारा प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचाच विचार केला जाईल. या कार्यालयास परस्पर दिलेल्या ई टेंडरींग पुर्वीच्या प्रस्तावांचा व नंतर येणाऱ्या प्रस्तावांचा विचार संस्था निश्चितीसाठी केला जाणार नाही.

**२६. सुरक्षा अनामत:- ज्या निविदाधारकाची ई-निविदा स्विकृत केली जाईल त्यांना सुरक्षा ठेव अनामत पुरवठा आदेशाच्या ५% प्रमाणे भरणा करावी लागेल व तसेच शासकीय नियमाप्रमाणे होणाऱ्या मुद्रांक कागदावर करारनामा करुन देणे बंधनकारक राहील. सुरक्षा अनामत रक्कम प्रशिक्षण पूर्ण झाल्याशिवाय व लेखापरिक्षण झालेशिवाय परत दिली जाणार नाही तसेच त्या रकमेवर व्याज दिले जाणार नाही.**

२७. **परिमाण:-**प्रशिक्षणार्थींची संख्या ही निविदेत प्राप्त होणाऱ्या दरावर अवलंबुन असेल.

२८. **प्रशिक्षणाची गुणवत्ता:-** प्रशिक्षणांची गुणवत्ता या विभागामार्फत कोणत्याही शासकीय अधिकारी यांचेमार्फत करणेत येईल.

२९. **प्रशिक्षणाचा कालावधी:-** प्रशिक्षणे हे वरील अटी व शर्तीप्रमाणे कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत आदेश दिल्यानंतर ३० मार्च २०१८ चे आत प्रकल्पस्तरावर बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे सहमतीने आठवडयातुन दोन तास याप्रमाणे एकुण १२० तास घ्यावी लागतील . प्रशिक्षणे घेतली नाही तर कार्यारंभ आदेश रद्द करुन दंडात्मक कार्यवाही केली जाईल. सुरक्षा रक्कम व बयाना रक्कम जप्त केली जाईल. अपवादात्मक परिस्थितीत प्रशिक्षण कालावधीस वाढ देण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना राहतील.

३०. प्रशिक्षणे ही गुणवत्ता पूर्वक आढळून न आल्यास करार रद्द करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेस राहतील.

३१. या ई-निविदेतील मंजुर दरास जिल्हा परिषदेकडून मान्यता प्राप्त झाल्यातारखेपासुन एक वर्षाकरीता राहील. सदर कालावधीत केंद्र शासन किंवा राज्य शासन यांचेमार्फत शासकीय करात वाढ झाल्यास वाढीव कर वेगळा देण्यात येणार नाही.

३२.ई-निविदेतील अटी व शर्तीमध्ये बदल अथवा शिथील करण्याचा, निविदा कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

३३.कोणतेही कारण न दाखविता ई-निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना राहील. तसेच या बाबतीत कोणताही वाद निर्माण झाल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील. याबाबत न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास सदर प्रकरण नाशिक येथील न्यायालयातच दाखल होऊ शकतील.

३४. **प्रदान (पेमेंट):-** ई-निविदेद्धारे खरेदी करावयाच्या वस्तुंसाठी विभागास आदिवासी उपयोजना अंतर्गत मंजुर नियतव्ययानंतर निधी प्राप्त होत असतो त्यापैकी आदिवासी उपयोजना यांचा निधी मागणी केलेला असुन सदर निधी उपलब्धतेत विलंब झाल्यास पुरवठादारास त्यावर व्याज अथवा भरपाई मागणी करता येणार नाही. निधी उपलब्धतेनंतर पुरवठयांचे देयक अदा केले जाईल.

३५. निविदा प्रक्रीये दरम्यान उपरोक्त प्रशिक्षणाबाबत शासनाने संस्था निश्चित केल्यास निविदेतील मंजुर दरापेक्षा शासनाचे मंजुर केलेले दर कमी असल्यास त्या संस्थांकडून अथवा त्या कमी दरात प्रशिक्षण घेणे बंधनकारक राहील.

**दिंनांक :- / /२०१८**

**(निविदाधारकाची स्वाक्षरी)**

**संपूर्ण नाव व पत्ता.**

**महिला व बाल विकास अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**

**प्रशिक्षणा बाबत बंधपत्र**

**(महिला व बाल विकास विभाग जिल्हा परिषद, नाशिक)**

**यांची जाहीर निविदा सुचना क्र. ७/२०१७-१८ (द्वितीय प्रसारण) दि. ----------------**

मी / आम्ही गांभीर्य पुर्वक नमुद करतो की, मी / आम्ही वर नमुद केलेल्या प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असुन या निविदेसाठी माझे/आमचे दर निविदेसोबत असलेल्या प्रपत्र १ मध्ये नमुद करीत आहे/आहोत.

जर माझे/आमच्या निविदा स्विकृत करण्यात आली तर या निविदेतील सर्व अटी व शर्तींचे पालन करण्यास मी / आम्ही अधिन राहुन या अटी व शर्तीचा भंग मी/आम्ही केल्यास या निविदेतील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशिलानुसार मी/आम्ही दंडनिय कार्यवाहीस पात्र राहु.

ही निविदा स्विकृत झाल्यास मी/आम्ही दिलेले दर हे एक वर्ष पर्यंत अंमलात राहतील व या मुदतीमध्ये हे दर स्विकृत केले गेल्यास त्या दराने प्रशिक्षण देण्यास मी/आम्ही बांधील राहु.

मी/आम्ही निविदेतील दिलेल्या साहित्यांचा पुरवठा निविदा फॉर्म मधील तपशिलानुसार व वरील अ क्र. १ ते ३५ नुसार करण्यास बांधील राहू.

**दिंनांक :-    /१/२०१८**

**(निविदाधारकाची स्वाक्षरी)**
**संपूर्ण नाव व पत्ता.**

**महिला व बाल विकास अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**

# लिफाफा क्र. २:- व्यापारी लिफाफा

## विवरण पत्र ब - मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारीरीक विकासासाठी प्रशिक्षण देणे कामी नमुद करावयाचे दर पत्रक

| अ. नं. | प्रशिक्षणाचे नांव | प्रशिक्षणाची एकुण रक्कम | संस्थेने नमुद करावयाचे दर |
|---|---|---|---|
| १ | इ. ४ थी ते १० वी पर्यंतच्या व महाविद्यालयातील मुलींना तसेच शाळेतील इच्छुक महिला शिक्षकांना ज्युडो कराटे प्रशिक्षण देणे. | र.रु. ४०,००,०००/- | |

वरील प्रमाणे प्रशिक्षणाचे दर आम्ही नमुद करत असुन निविदे मधील अटी व शर्तीचे अधिन राहून काम करणेस तयार आहोत.

निविदा धारकाची सही व शिक्का

महिला व बाल विकास अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक